## Criterion 5- Student Support and Progression

SAHAKAR MAHARSHI LATE BHASKARRAO SHINGNE ARTS COLLEGE, KHAMGAON

Internal Quality Assurance Cell

**Name of Activity:** Online workshop on Yoga and personality Development

**Department:** Physical Education

**Name of Organizer:** Mr. G.S. Vishwakarma

**Date:** 21 Apr. 2022

| Name of Resource person | Aim and Objectives of the Activity | Number of Beneficiaries | Outcomes of Activity | Remarks |
|---|---|---|---|---|
| Dr. Babasahe Sangle Bapumiya Patel Arts, Commerce and Science ,Pimpalgao Kale | To Develop personality through Yoga workshop | 40 | Students watched carefully and understood the role of yoga in their personality development | |

IQAC Coordinator

Organizer


Principal


IQAC Coordinator
Sahakar Maharshi Late Bhaskarrao Shingne Arts College, Khamgaon

Principal
Sahakar Maharshi Late
Bhaskarrao Shingne Arts College
Khamgaon


S.M.B.S. Arts College * Khamgaon *


**Criterion 5- Student Support and Progression**



**Criterion 5- Student Support and Progression**



दैनिक विचार देशहिताचा आवाज महाराष्ट्राचा

# परमादेश

संपादक: प्रा.कृष्णा प्रकाश मेसरे
मो.: ९२७०५०७०१९

❋ वर्ष ०१ ले ❋ अंक २२ ❋ शनिवार, २३ एप्रिल २०२२ ❋ पृष्ठे:०४

## हिंमत असेल तर राणा दाम्पत्यानं बाहेर पडून दाखववावं, शिवसेनेचे खुले आव्हान

**मुंबई : प्रतिनिधी**

राणा दाम्पत्याच्या मुंबईतल्या खार निवासस्थानी शिवसैनिकांचा खडा पहारा दिला आहे. हिंमत असेल तर राणा दाम्पत्यानं बाहेर पडून दाखवावंच, असे खुलं आव्हान शिवसैनिकांनी राणा दाम्पत्याला दिले आहे. भाजपच्या सांगण्यावरुन स्टंट करत असल्याचा आरोप यावेळी शिवसेनेने केला.

**शिवसैनिकांनी जोरदार फिल्डिंग**

मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना थेट आव्हान देणाऱ्या राणा दाम्पत्याच्या घराबाहेर शिवसैनिकांनी जोरदार फिल्डिंग लावली. नवनीत राणा आणि रवी राणा यांच्या मुंबईतील खारच्या घराबाहेर शिवसैनिकांनी रात्रभर खडा पहारा दिला. राणा दाम्पत्याला घराबाहेर पडू न देण्याची व्यूहरचना शिवसैनिकांनी आखली. त्यामुळे काल संध्याकाळपासूनच शिवसैनिक तिथं जमले आणि त्यांनी भजन-कीर्तन सुरु केलं. इमारतीबाहेर बॅरिकेटिंग करण्यात आलं. त्याच्या बाहेरच्या बाजूला शिवसैनिक जमलेत.

**शिवसैनिकांनी घरी जाण्यास नकार**

राणा दाम्पत्य मातोश्रीवर आज धडक देणार असल्यामुळे



शिवसैनिकांनी मातोश्रीबाहेर रात्रभर पहारा देण्याचा निर्णय घेतला. मुख्यमंत्र्यांनी वर्षावर जाण्यापूर्वी मातोश्रीबाहेर शिवसैनिकांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी महिला शिवसैनिकांना घरी जाण्याचं आवाहन केलं. मात्र शिवसैनिकांनी घरी जाण्यास नकार दिला. मुख्यमंत्री आणि त्यांच्या पत्नी रश्मी ठाकरे समोर आल्यानंतर शिवसैनिकांनी जोरदार घोषणाबाजी केली. राणांच्या इशारामुळे उद्धव ठाकरेंनी मातोश्रीवर बैठक घेऊन शिवसेना नेत्यांशी चर्चा केली.

**बाळासाहेब ठाकरे यांचा टॅटू**

मुंबईतील खारमध्ये रहाणाऱ्या एका कट्टर शिवसैनिकाने स्वतःच्या छातीवर आणि पाठीवर बाळासाहेब ठाकरे यांचा टॅटू काढला आहे. मातोश्री आमची आई आहे, त्यांच्याबद्दल कोणी बोललं तर त्यांना महाप्रसाद देऊ अशी भावना शिवसैनिक गणेश गावडे यांनी व्यक्त केली आहे.

**राणा दाम्पत्य हनुमान चालीसा वाचवण्यावर ठाम**

मुख्यमंत्र्यांना आव्हान देणारं नवनीत राणा आणि रवी राणा दाम्पत्य मातोश्रीवर जाऊन हनुमान चालीसा वाचवण्यावर ठाम आहे. आज सकाळी ९ वाजता राणा दाम्पत्य मातोश्रीवर धडकणार आहेत. कायदा आणि सुव्यवस्था बिघडू नये यासाठी पोलिसांनी कालच राणांना नोटीस बजावली आहे. तरीदेखील मातोश्रीवर जाण्याचा निर्धार पत्रकार परिषदेत बोलून दाखवला. तर हनुमान चालिसा म्हटल्यावर प्रसाद देण्याची परंपरा आहे, शिवसैनिक त्यांना प्रसाद देतील, असा इशारा शिवसेना नेत्यांनी दिला आहे.

## माझ्या मतदारसंघातील प्रत्येक गाव माझे - आ.राजेश एकडे



**किशोर वाकोडे : शेंबा**

मलकापूर विधानसभा मतदारसंघाचे लोकनेता आ. राजुभाऊ एकडे हे शेंबा बु व शेंबा खुर्द येथील सुपे व ढोण कुटुंबियांच्या सात्वनपर भेटीला आले असता त्यांनी शेंबा बु येथील ग्रामपंचायतीला आवर्जून भेट दिली. राजेश एकडे आमदार झाल्यापासुन त्यांनी मतदारसंघात घेतलेल्या विकासकामांचा झंझावात हा थांबता थांबत नाही. त्यामध्ये शेंबा गाव सुध्दा मागे नाही. त्यांच्या केवळ २ वर्षांच्या कार्यकाळात शेंबा गावाला जवळपास ३ कोटी रुपये विकास निधी उपलब्ध करून दिला. त्याबद्दल, त्यांचा ग्रामपंचायत शेंबा यांचे वतीने कार्यालयात सरपंच व सर्वस्वी सदस्य यांचेकडुन सत्कार करण्यात आला.

सत्काराला उत्तर देतांना आ. एकडे म्हणाले की, माझ्या मतदारसंघातील "प्रत्येक गांव माझे गांव आहे" जोपर्यंत पर्यंत प्रत्येक गांव-खेड्यात विकास होणार नाही तोपर्यंत मी स्वस्थ बसणार नाही. याप्रसंगी सरपंच नंदुभाऊ खोंदले, सुधाकर तायडे पोलीस पाटील, गजाननभाऊ खोंदले, अतुल सुपे, अनिल पाटील, तालुका कॉंग्रेसचे मंगेश भिडे, प्रविण भिडे ग्रामपंचायत सदस्य तसेच इतर सर्व सदस्य आणी गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

## योगशारीरिक व मानसिक शांती प्रदान करते-डॉ. बाबासाहेब सांगळे

**खामगाव : प्रतिनिधी**

स्थानिक खामगाव येथील सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालयात योग आणि व्यक्तिमत्व विकासावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली.आजच्या आधुनिक काळात समाजात सामाजिक अस्थिरता पसरलेली असताना कार्यक्रमाचे मार्गदर्शक डॉ. बाबासाहेब सांगळे संचालक शारीरिक विभाग यांनी योगाचे महत्त्व पटवून दिले. आपल्या अष्टांग योगच्या माध्यमाने आजच्या सामाजिक विषमतेला दूर करता येईल.योग करून विद्यार्थी आपला व्यक्तिमत्व विकास करून आदर्श नागरिक बनू शकतात. असे सांगळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.



या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नीलिमा देशमुख होत्या.आपल्या अध्यक्षीय भाषणात आज विद्यार्थीदशेत विद्यार्थिनींनी योगासन प्राणायन करून आपल्या व्यक्तिमत्व विकास करून घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

हा कार्यक्रम महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण विभागातर्फे घेण्यात आला.कार्यक्रमाचे संचालन प्रा. गणेश विश्वकर्मा यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा संदीप लांडे यांनी केले कार्यक्रमात महाविद्यालयातील प्रा मनोहर वासनिक, प्रा गोपाल राखुंडे, डॉ.प्रमोद चव्हाण डॉ.हर्षा ढाले डॉ. दयानंद राऊत संपूर्ण शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी सहभागी होते.